।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

## Office of the Director-Board of Examinations & Evaluation

Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: srtmuncoe@gmail.com
srtmundboee@gmail.com

जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०१८–१९/2197 दिनांक : २५/०१/२०१९ 22

परिपत्रक

सन २०१८–१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत व उन्हाळी २०१९ परीक्षेकरीता परीक्षाशुल्क न घेता आवेदनपत्र स्विकारणेबाबत.

या परिपत्रकान्वये प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.शालेयशिक्षण विभाग क्र . एफईडी–१५९२/१२०२/११३२/सांशि–५, दि. १८/१०/१९९३ नुसार राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. तसेच महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय–२०१८/प्र.क्र. ८९/म–७, दि. २३ऑक्टोंबर २०१८ नुसार महसुल व वन विभागाकडुन लागू केलेल्या तालुक्यामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थीती जाहीर करण्यात आली आहे व त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

मा.संचालक,उच्चशिक्षण संचालनालय म.रा.पुणे यांचे पत्र क्र. उशिसं२०१८/परीक्षाशुल्क/शिष्यवृत्ती/१९०२३, दि.१७/११/२०१८ नुसार परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार परीक्षा फी माफीसाठी पात्र असणा–या विद्यार्थ्याकडुन उन्हाळी २०१९ करीता परीक्षा फीस स्विकारु नये. सदर परीक्षा शुल्क माफी योजनेबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. राज्याच्या अधिवास असलेल्या व रु.८.००लक्ष या मर्यादिपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषीत केलेल्या महसुल मंडळातील विद्यार्थ्यांकरीता लागू राहील.

२. हि सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही.

अ. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस—यांदा परीक्षेला बसले असतील

क. जे विद्यार्थी बहिस्थ म्हणुन नोंदले असतील

ड. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नौकरी धंदा करतात परंतू त्यांच्या नावे शेत जमीन आहे अशा विद्यार्थ्यांना

३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना या योजनेत ५० टक्के परीक्षा शुल्क अनुज्ञेय असल्याने त्या विद्यार्थ्यांना केवळ ५० टक्के परीक्षा शुल्क माफी अनुज्ञेय आहे.

सबब, वरीलप्रमाणे शासनाच्या निर्देशानुसार परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र असणा—या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०१९ च्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्र स्विकारावेत व या परीक्षा शुल्काच्या प्रतिपुर्तीसाठी अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र यादी खालील तक्त्यामध्ये परीक्षा आवेदनासोबत परीक्षा विभागात दि. २८/०२/२०१९ पर्यंत सादर करावीत. उशिराने प्राप्त होणा—या प्रस्तावावर जर शासनाने मान्यता न दिल्यास ते सर्व परीक्षा शुल्क महाविद्यालयास भरावे लागेल, कृपया याची नोंद घ्यावी.

आपला,

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव सादर :

१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय म.रा.पुणे.
३. मा. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
४. मा. विभागीय सहसंचालक उच्चशिक्षण नांदेड विभाग
५. मा. विभागीय सहसंचालक तंत्रशिक्षण औरंगाबाद
६. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ